# उप वन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यालय

वनभवन उस्मानपुरा औरंगाबाद ४३१००५, दुरध्वनी क्रमांक २३३४७०१,२३४५४२२

पत्र

**विषय :** Rehabilitation and Upgradation of Aurangabad-Phulambri-Sillod-Ajanta-Pahur-Jalgaon Road.

जा.क्र.ब/जमीन/औ-ज/प्रक्र. १८०५ /२०१८-१९
औरंगाबाद. दिनांक : ९ / ९ / २०१८.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
औरंगाबाद.

**संदर्भ:-** आपलेकडील पत्र क्र.-NHD/Abad/३०६/TS-१/२३८५/दि. ०८.०८.२०१८.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत महामार्ग क्रमांक २११ औरंगाबाद-फुलंब्री-सिल्लोड-अजिठा-पहुर-जळगाव करीता क्षेत्र ५.३०९ हेक्टर वनक्षेत्राचा खालील प्रमाणे वळतीकरणाचा प्रस्ताव आपण या कार्यालयास सादर केला आहे.

| अ.क्र. | वनपरिक्षेत्र | गावाचे | वनकक्ष क्र. | क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबाद | सावंगी | २०९ ब | ०.९३६ |
| | | चौका | २१,२० | २.४७७ |
| | | बिल्डा | ११ अ | १.८९६ |
| | | | एकुण | ५.३०९ |

सदर प्रस्तावाची छाननी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

१. अनुक्रमणिका जोडण्यात आलेली नाही.
२. बाधित होणाऱ्या क्षेत्राचा गाव,गट नं.,कंम्पार्टमेंन्ट,निहाय विवरण तक्ता जोडण्यात आलेला नाही.
३. संबधित ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाण पत्र व इतर अभिलेख जोडलेले नाहीत.
४. वन्यजीव विभागाचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.
५. No violation Certificate जोडलेले नाही.
६. Minimum Demand of Forest Land बाबत जिल्हाधिकारी व यंत्रणा यांचे प्रमाण पत्र जोडलेले नाही.
७. Outside/inside Scheduled Tribal Area बाबत यंत्रणेचे प्रमाण पत्र जोडलेले नाही.

८. C.A.Cost व NPV चे प्रमाण पत्र जोडलेले नाही.

९. वनहक्क अधिनियम -२००६ बाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे प्रमाण पत्र जोडलेले नाही.

१०. बाधीत क्षेत्राचे ७/१२ उतारे मराठी व आंग्ल भाषेत भाषांतर करुन जोडलेले नाहीत.

११. बाधीत होणारे क्षेत्र गावनकाशावर दर्शवून बाधीत होणारे क्षेत्र हे अल्फाबेटने (A,B,C,D) असे दर्शवून गावनकाशे जोडलेले नाही.

१२. बाधीत होणाऱ्या वनक्षेत्रात वृक्ष तोड होते किंवा कसे होत असल्यास तोडीची वेढी निहाय प्रजाती निहाय झाडांची यादी तसेच सदर झाडे तोडीचे अंदाजपत्रक प्रस्तावात जोडलेले नाही.(सदर बाबतीत वनपरिक्षेत्र अधिकारी औरंगाबाद यांची मदत घ्यावी.) त्याबाबतचे प्रमाण पत्र जोडण्यात यावेत.

१३. प्रस्तावातील वळतीकरण क्षेत्राचे KML Files तयार करुन त्याची CD सोबत देण्यात आलेली नाही.

१४. वळतीकरण क्षेत्राचे बदल्यात दुसरे वनेत्तर क्षेत्र उपलब्ध असल्याबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे प्रमाण पत्र जोडलेले नाही.

१५. सदर प्रस्तावात Three Alternative Alignment Map जोडण्यात आलेला नाही.

१६. अभयारण्यापासून बाधित होणाऱ्या वनक्षेत्राचे अंतर दर्शविणारा नकाशा (टोपोशिट) जोडण्यात आलेले नाही.

१७. प्रकल्प यंत्रणेचे **COST-BENEFIT ANALYSIS** जोडलेले नाही.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते उपरोक्त नमूद त्रुटीची पुर्तता करुन तसेच भारतीय वन अधिनियम १९८० अंतर्गतचे प्रस्ताव यासोबतचे चेक लिस्ट प्रमाणे परिपुर्ण तयार करुन सात प्रतीत या कार्यालयास सादर करावा.जेणेकरुन त्रुटीविरहीत सदरचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.तरी आपला सदरचा प्रस्ताव यासोबत परत पाठविण्यात येत आहे.

**उपवनसंरक्षक**
**औरंगाबाद वन विभाग औरंगाबाद**

O/C

प्रतिलिपी :- मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषीत.
प्रतिलिपी :-सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण) औरंगाबाद/सिल्लोड/वनपरिक्षेत्र अधिकारी औरंगाबाद/खुलताबाद यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव रवाना.

**उपवनसंरक्षक**
**औरंगाबाद वन विभाग औरंगाबाद**

O/C